
ई साहित्य प्रतिष्ठान®

# दृष्टिकोन




- राहुल अरुणाकिशन रणसुभे

पुस्तकाचे नांव : चित्रशक्ती

संकलन : राहुल अरुणाकिशन रणसुभे
Mobile : +91 97 62 771 320,
Email – marathwadacomicsclub@gmail.com
page : **www.marathwadacomicsclub.com**

प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठान
Mobile : +91 9869674820
Email – esahity@gmail.com
**page : www.esahity.com**

*e Sahity Pratishthan*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा इतर कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**©esahity Pratishthan 2012**

*या पुस्तकातील सर्व चित्रांचे हक्क त्या त्या चित्रकाराकडे सुरक्षित असून त्यांचा वापर इतर कोणत्याही ठिकाणी करायचा झाल्यास श्री राहुल अरुणाकिशन रणसुभे यांच्याशी संपर्क साधावा*

# स्त्री अत्याचार – एक समस्या

" शिकलेली आई घरादाराला पुढे नेई"... अशी एक चांगली म्हण मराठीत आहे. आता प्रश्न असा आहे की, ही शिकलेली आई म्हणजे कोण?
जिला जन्माला येण्या आगोदरच मारुन टाकण्यात येते...

जिचा हुंड्यासाठी छळ करण्यात येतो, लाथाने तुडवण्यात येते एवढेच नव्हे तर तिला याच हुंड्यासाठी जिवंत जाळण्यात येते, जिच्या मनात नसताना सुध्दा सासरच्यांकडून तिच्या पोटात असलेल्या मुलीला जबरदस्ती मारुन टाकण्यास सांगितले जाते,

या सारखी अनेक उदाहरणं आज आपल्या देशातील घरांघरातून घडत आहेत परंतु या विषयांवर मोकळेपणाने बोलण्यास कोणीच तयार नाही, कारण इज्जतीचा प्रश्न, घराण्याच्या अब्रूचा प्रश्न या मुळे याप्रकारच्या स्त्री अत्याचारांचे गुन्हे पोलिसांपर्यंत जातच नाही आणि जे या विषयावर बोलू इच्छीतात त्यांचे गळे आवळण्यात येतात. त्यामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस अधीकच गंभीर होत चालला आहे.

या प्रश्नाची गहनता तसेच आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान याबाबत त्या स्त्रीचे स्वत:चे काय म्हणणे आहे, याच समाजातील इतर लोकांचा काय विचार आहे हे सर्व जाणून घेण्यासाठी मराठवाडा कॉमिक्स क्लबने अनेक कार्यशाळांतून लोकांना या विषयावर बोलण्यास भाग पाडले आणि त्यांच्याकडून त्यांच्याच भाषेत कॉमिक्स बनवून घेण्यात आले. काही ठिकाणी स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण जास्त आहे असे कळल्यावर एका संस्थेच्या मदतीने विशिष्ट समाजाच्या तांड्यात कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेतील कॉमिक्स मधून तेथील स्त्रीयांनी आपल्या घरच्या, तांड्यातील शेजाऱ्यांच्या, गोष्टी मांडण्यास सुरुवात केली. जेव्हा हे कॉमिक्स गावात लावण्यात आले तर या विषयांवर कधीच न बोलणारी लोकं अक्षरश: स्त्री भ्रूण हत्येच्या विषयांवर एकत्र येऊन चर्चा करु लागली. अनेक वृध्द स्त्रीयांनी तर आम्ही आमच्या डोळयांनी लहान मुलींना मारलेले पाहिले आहे असे म्हणतं रडू लागल्या होत्या.

हे सत्य फक्त एका ठिकाणापुरते, अथवा एका तांड्यापूरते नव्हते तर संपूर्ण देशातील अनेक ठिकाणे जिथे ही स्त्री भ्रूण हत्येची समस्या आहे तेथील हीच परिस्थिती आहे.

आज स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालताना दिसते आणि तीच स्त्री कुठेतरी पुरुषांच्या, समाजाच्या पायाखाली तुडवली जात आहे. अनेक ठिकाणी तर स्त्रीच स्त्रीची मोठी वैरीण बनलेली दिसते. खूप शिकलेल्या, मोठ्या पदांवरील स्त्रीया सुध्दा अशा प्रकारच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्या दिसतात. तेव्हा शिकलेली आई हीच कशी दूसऱ्या आईची दुश्मन असू शकते हा प्रश्न खरंच डोके भंडावून सोडणारा आहे.

तेव्हा अशा परिस्थितीवर मोकळेपणाने बोलणे, लोकांना बोलायला लावणे हेच महत्वाचे आहे. मराठवाडा कॉमिक्स क्लबने अशाच काही लोकांच्या गोष्टी या पुस्तकात मांडल्या आहेत. ह्या सर्व कथा स्वत:हून आपणास काही तरी सांगण्याचा प्रयत्न करत आहेत.

या पुस्तकातील कॉमिक्स वाचून आपणास आम्हाला काही सांगावेसे वाटले, अथवा तुमच्याकडे एखादी कथा आहे आणि ती तुम्ही आमच्यासोबत शेअर करु इच्छित आहात तर ती आवश्य आम्हाला पाठवा. आम्ही तुमच्या प्रतिक्रियांची आणि कथांची वाट पाहत आहोत.

आमचा ईमेल –**marathwadacomicsclub@gmail.com**


# आई मला वाचव




www.marathwadacomicsclub.com

सौ. सरुबाई कृष्णा राठोड
अन्नोर तांडा नं 6
सचिन प्रकाश जाधव
कार्डिवा

# आयुष्याचा प्रश्न




www.marathwadacomicsclub.com

पुजा नारळे


# भाऊराया






संदिप माणिकराव मेश्रा
B.S.W. II

# एक कळी उमललेली




www.marathwadacomicsclub.com

नाव :- पूजा देविदास सपकाळे
M.S.W 2nd yr
सामाजिक कार्य महाविद्यालय

# गंगुची करामत




www.marathwadacomicsclub.com

कु. सोनाली वासुदेव वसाके
सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ

# घोडं अडलं शिक्षणानी.




www.marathwadacomicsclub.com

नाव :- प्रगती दिपकराव वरघट
सावित्री जोतीराव समाजकार्य,
महाविद्यालय यवतमाळ.

# * जागृती *






नाव ⇒ निता सुखलाल आगे.
सामाजिक कार्य महाविद्यालय
M.S.W II year.


# कन्या बचाओं




www.marathwadacomicsclub.com


Mugdha S. Mayadeo
MA(MCJ)-I st Sem.
Dr. BAMU.

# कोमेजलेली कळी




www.marathwadacomicsclub.com

रेखाकृति कल्याण जाधव KT1
राजेश जनार्धन जाधव
शा. कचनेर तांडा नं. १

# मला माफ कर !....




www.marathwadacomicsclub.com

कु. स्नेहा विजय तुरे
सावित्री जोतीराव समाजकार्य
महाविद्यालय. यवतमाळ

# तरुणींनो जागे व्हा !!




www.marathwadacomicsclub.com

* नाव :- मिनाक्षी भास्कर गवई
* वर्ग :- M.S.W II[nd] year
* सामाजिक कार्य महाविद्यालय

# शोषणकी पोटली




www.marathwadacomicsclub.com

जी. ह. बारसवडे —
औरंगाबाद.




www.marathwadacomicsclub.com

उमा नामदेव धुर्वे
सावीत्री जोतीराव समाजिक महाविद्यालय यवतमाळ

# प्रेम रोग






प्रमोद दत्तात्रय नाटकर
सावित्री जोतीराव समाजकार्य
महाविद्यालय यवतमाळ
B.S.W. I

# 'नेविरेफीन' जीवनदान




www.marathwadacomicsclub.com

उषा गायकवाड

# हे पुस्तक कसे वाटले ?

हे पुस्तक कसे वाटले ? मनोरंजन म्हणून कसे वाटले? लोकशिक्षणाचा एक प्रयोग म्हणून कसे वाटले? या पुस्तकाचा पुढला भाग यायला हवा का? तुम्हाला वाचायला आवडेल का? तुम्ही स्वतःहून पैसे देऊन विकत घ्याल का असे पुस्तक?

आज आपण आजुबाजूला प्रचंड भ्रष्टाचार बघतो. हिंसाचार आणि अत्याचार पहातो. राजकारण आणि सत्तेसाठी चाललेली स्पर्धा पहातो. समाजजीवनात असंख्य प्रश्न बघतो. शेतकरी आत्महत्या करतात. सुनांना हुंड्यासाठी जाळलं जातं. फ़ी भरणं शक्य नसलेल्या मुलांना बालमजूर म्हणून काम करताना पहातो. हे केवळ बघतो. आणि मनातल्या मनात हळहळतो. याचं कारण समाजातल्या बड्या लोकांचा हात धरणं आपल्याला शक्य नसतं. आपण स्वतःला हतबल समजतो. आणि समाजातल्या दुर्बल घटकांना तर कोणी काही समजतच नाही. ती तर मुकी जनावरंच जणू. त्यांना काही बोलता येत नाही. त्यांना फ़क्त निवडणूकीत सांगू त्या बटनावर बोट दाबता येतं असा आपला समज आहे.

अशा वेळी मराठवाडा कॉमिक्स क्लब या मुक्यांना वाचा देतं आहे. आणि बहिर्‍यांना समजेल अशा भाषेत बोलायची कला शिकवत आहे. समाजातल्या सर्व प्रश्नांवर उत्तर तेव्हाच येईल जेव्हा अन्याय सोसणारी व्यक्ती अन्यायाला वाचा फ़ोडेल. आणि म्हणून या चित्रशक्तीतून आम्हाला समाजातल्या प्रश्नांची उत्तरे येण्याची आशा वाटते.

ई साहित्य प्रतिष्ठान या कॉमिक्स क्लबला सादर मुजरा करतं आहे.

यांची पुस्तकं घराघरातून वाचली जायला हवीत असं आम्हाला वाटतं.

आता सांगा. यांची पुस्तकं आपण विकत घेणार ना?

**मराठवाडा कॉमिक्स क्लब**

मराठवाडा कॉमिक्स क्लबची स्थापना २४ फेब्रुवारी २०१० ला झाली. याच तारखेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सामाजिक कार्य महाविद्यालयात आपली पहिली कार्यशाळा घेऊन मराठवाडा कॉमिक्स क्लबने महाराष्ट्रात पहिल्यांदाच कॉमिक्सद्वारे सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकण्यास तसेच लोकांना आपली गोष्ट कॉमिक्सच्या माध्यमातून जनतेसमोर ठेवण्याचे एक वेगळे तंत्र विकसित करुन दिले.

आज २०१२ पर्यंत या संस्थेने आतापर्यंत अनेक विषयांवर कॉमिक्स कार्यशाळा घेतल्या. यात प्रामुख्याने महिला अत्याचार, बालविवाह, हुंडाप्रथा, स्त्री भ्रूणहत्या, एचआयव्ही/एड्स जनजागृती, बालमजूरी, पर्यावरण, वैश्विक उष्णता, भ्रष्टाचार, अंधश्रध्दा, अपंगत्व इत्यादी विषयांवरील समजूती गैरसमजूतींवर कॉमिक्सच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याऱ्या जवळपास २०० ते २५० कॉमिक्स या कार्यशाळांतून बनवण्यात आले आहेत.

कॉमिक्स हा असा विषय आहे जो लहान मुलांपासून तरुण वर्ग तसेच वयोवृध्दांपर्यंत अत्यंत आवडीने वाचला जातो. वृत्तपत्रात कोपऱ्यात येणारे व्यंगचित्र (पॉकेट कार्टून) ज्याप्रमाणे अनेक गंभीर विषयांवर विनोदी अंगाने प्रकाश टाकते तर काही कॉमिक्स छोट-छोट्या गोष्टींतून लोकांचे मनोरंजन करतात. परंतु हे सर्व कॉमिक्स, व्यंगचित्र हे कोण्या एका कलाकाराकडून काढलेले असतात. त्यामुळे या कॉमिक्स, व्यंगचित्रांमध्ये कलाकाराच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या गोष्टी, चर्चेचे विषय, तसेच त्याला जशी आवडते तशी वेषभूषा अशाच गोष्टींना प्राधान्य दिले जाते. परंतु या व्यंगचित्रांमध्ये, कॉमिक्स मध्ये एका सामान्य माणसाची व्यथा, समस्या दाखविली जातेच असे नाही. त्यांच्या जवळच्या विषयांबाबत भाष्य केले जातेच असे नाही. त्यामुळे मराठवाडा कॉमिक्स क्लबने असे एखादे कॉमिक्स बनवायचे ठरवले ज्यातून सामान्य माणसांच्या व्यथा, समस्या, अडचणी, तसेच त्यांनी या समस्यांवर केलेले उपाय अशा गोष्टींना प्राधान्य देणारे विषय असतील.

याच संकल्पनेतून मग ग्रासरुटस् कॉमिक्सचा उदय झाला. तळागाळाच्या (ग्रासरुट्सच्या) लोकांनी बनवलेले कॉमिक्स.. म्हणजे “ग्रासरुटस् कॉमिक्स !”..

मराठवाडा कॉमिक्स क्लबने याच विचाराला आपले ध्येय मानून अनेक कार्यशाळांचे आयोजन केले. ज्यात सामान्य व्यक्तीला ग्रासरुटस् कॉमिक्स कसे बनवावे याचे तंत्र शिकवण्यात येते. या कार्यशाळेत अत्यंत सोप्या पध्दतीने कॉमिक्स बनवण्याचे तंत्र शिकवले जाते. कोणीही मग ती महिला असो अथवा पुरुष, अशिक्षित असो वा सुशिक्षित, बाल असो वा आजोबा.. कोणीही या कार्यशाळेत सहभागी होऊ शकतो. अट फक्त एवढीच आहे की, त्यांच्याकडे स्वतःची गोष्ट असणे गरजेचे आहे, ज्यांना लोकांना काही तरी सांगायचे आहे, एखादा महत्त्वाचा संदेश जनतेपर्यंत पोहचवायचा आहे, असेच लोक ग्रासरुट्स कॉमिक्स बनवू शकतात.

मराठवाडा कॉमिक्स क्लबचा मुळ उद्देश म्हणजे, सामान्य व्यक्तीला त्याचे म्हणणे, त्याची व्यथा, त्याची समस्या लोकांपूढे मांडण्यासाठी एक स्वतःचे असे माध्यम उपलब्ध करुन देणे ज्यामुळे तो त्याची गोष्ट लोकांसमोर मांडू शकेल. त्याची व्यथा जनतेपर्यंत पोहचवू शकेल. तेही कमी खर्चात. फक्त दोन ए-४ कागद व काळं पेन एवढ्या गोष्टी जर तुमच्याकडे असेल तर तुम्ही ग्रासरुट्स कॉमिक्स बनवू शकता.

आता पर्यंत मराठवाडा कॉमिक्स क्लबने औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील सामाजिक कार्य महाविद्यालय, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग, जनार्थ सामाजिक संस्था (औरंगाबाद) सावित्री- ज्योतीबा समाजकार्य महाविद्यालय (यवतमाळ), वॉटर संस्था (औरंगाबाद), संपदा ट्रस्ट (अहमदनगर), अदीती प्लान (मुजफ्फरपूर, बिहार), स्पंदन समाजसेवा समीती (खंडवा, मध्यप्रदेश) इत्यादी ठिकाणी ग्रासरुटस् कॉमिक्स कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

महाराष्ट्रात आज अनेक समस्या आहेत ज्यांच्याविषयी अजूनही मोकळेपणाने बोलले जात नाही मग ते एचआयव्ही/एड्स असो अथवा सेक्स एज्यूकेशन त्याच बरोबर शेतकरी आत्महत्या, हुंडाबळी, भ्रष्टाचार इत्यादी गंभीर विषयांवर जास्तीत जास्त कार्यशाळा घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्याचा मराठवाडा कॉमिक्स क्लबचा पुढील उद्देश आहे.

- **राहुल अरुणाकिशन रणसुभे**

संस्थापक,

मराठवाडा कॉमिक्स क्लब, औरंगाबाद

Mobile : +91 97 62 771 320,

Email – marathwadacomicsclub@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ**

*चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.*

*सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?*

*बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.*

***तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे** ?आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी* esahity@gmail.com बर पाठवा. *खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.*

*www.esahity.com*